




# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!








संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४८९ बुधवार दि १४ ऑक्टोंबर २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# शिवरायांचा महाराष्ट्र शिवराळ होतोय! ॲड. असीम सरोदेंचा घणाघात...

## आमदार गायकवाडांचा D.G.P कडे जिहादी अर्ज; प्रकाशकाची चौकशी, पण शिवीगाळ करणाऱ्या आमदारावरच कारवाई नाही!

**जनसंचलन/ बुलढाणा**

शिवाजी कोण होता? या ३७ वर्ष जुन्या पुस्तकावरून सुरू झालेला वाद आता पोलीस महासंचालकांच्या दारात पोहोचला आहे. शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी पोलीस महासंचालक यांच्याकडे तक्रार अर्ज करून पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांची चौकशी आणि मालमत्ता जप्तीची मागणी केली आहे. दरम्यान एका पत्रकार परिषदेत शिवरायांचा महाराष्ट्र शिवराळ होतोय असा ॲड.असीम सरोदेंनी मीडिया समोर घणाघात करून आमदार गायकवाड यांचे अर्जातील प्रश्न मूर्खासारखे असल्याचे म्हटले आहे. शिवाजी कोण होता?या पुस्तकाच्या वादावरून आमदार गायकवाड यांनी पोलीस महासंचालकांना दिलेल्या अर्जात म्हटले आहे की, या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी कोणत्या जिहादी, दहशतवादी संघटनेने पैसा पुरवला? याची चौकशी करावी.तसेच प्रकाशकाचे आरएनआय सर्टिफिकेट, प्रेस परवाना, आयटीआर आणि सर्व मालमत्ता राष्ट्रीय संपत्ती म्हणून जप्त करावी,अशी मागणी केली आहे.दरम्यान च्या आदेशावरून कोल्हापूरच्या राजारामपुरी पोलिसांनी प्रशांत आंबी यांना दोन दिवस पोलीस ठाण्यात बोलावून चौकशी केली. तुला कोणता जिहादी मदत करतो? तुझी मालमत्ता किती? बँकेत किती पैसे आहेत? असे प्रश्न विचारण्यात आले. यावर आंबी म्हणाले, ही चौकशीच बेकायदेशीर आहे. माझी आई यल्लवा जोगवा मागते, बहीण धुणी-भांडी करते.माझ्याकडे ९९ वर्षाच्या भाडेकरारावर एकच घर आणि एक दुचाकी आहे. पोस्टाने मला ३ लाख २० हजारांची वसुली नोटीस पाठवली आहे. माझे ३ हप्ते थकले आहेत. मग माझ्याकडे कोट्यवधीची मालमत्ता कुठून आली? संजय गायकवाड सारखे अशिक्षित, अडाणी प्रवृत्तीचे लोक पूर्ण पुस्तक वाचत सुद्धा नाहीत आणि इतरांना शिवीगाळ सुरु करतात. त्यांचे प्रश्न हे निव्वळ मूर्खासारखे आहेत. छत्रपतींना आपल्या आईप्रमाणे हृदयात स्थान देऊन शिवाजी म्हणणे हा अपमान नाही. आता अशा मूर्खतेला कायद्याने लगाम लावावा लागेल.




आमदारांनी ९ मिनिटांत ३६ शिव्या, आई-बहिणीवरून अत्यंत अश्लील शिवीगाळ आणि कुटुंबाला बलात्काराची धमकी देऊन १६३ दिवस उलटले, तरी त्यांच्यावर गुन्हा दाखल होत नाही. आणि ज्याला धमकी दिली, त्याचीच उलट चौकशी होते, हा कोणता न्याय आहे? शिवरायांचा महाराष्ट्र शिवराळ होतोय. असे सरोदे म्हणाले.पुढे जाहीर केले की, लवकरच बुलढाणा येथे, आमदार गायकवाडांच्या मतदारसंघातच शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे जाहीर वाचन करण्यात येणार आहे.

---

# धाडच्या रिजवान सौदागरांच्या लेआउटमध्ये रात्री काय घडलं? सकाळी ठेकेदार आले अन्!

**जनसंचलन/धाड**

रस्त्याच्या कामाला नुकतीच सुरुवात झाली सायंकाळी काम आटोपून कामगार निघून गेले मात्र सकाळी ठेकेदार पुन्हा कामावर पोहोचले, तेव्हा तेथे ठेवलेले चार लोखंडी चॅनल गायब होते! धाड येथील रिजवान सौदागर यांच्या शेतातील लेआउटमध्ये हा चोरीचा प्रकार उघडकीस आला आहे. वालसा वडाळा, ता. भोकरदन, जि. जालना येथील बांधकाम ठेकेदार भाऊसाहेब रामदास सानवणे यांनी सौदागर यांच्या गट क्रमांक ४६६ मधील लेआउटच्या सिमेंट रस्त्याचे काम घेतले आहे. ११ ऑक्टोबर रोजी काम सुरू केल्यानंतर रात्री आठ वाजेपर्यंत काम करून ते निघून गेले. बांधकामाचे साहित्य आणि चार लोखंडी चॅनल कामाच्या ठिकाणीच ठेवले होते. १२ ऑक्टोबरला सकाळी साडेनऊच्या सुमारास सानवणे कामावर आले असता चॅनल दिसले नाहीत. प्रत्येकी तीन हजार रुपये किमतीचे चार चॅनल, असा एकूण १२ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार त्यांनी धाड पोलिसांत दिली. तक्रारीनुसार, चोरीचा कालावधी ११ ऑक्टोबरच्या रात्री दहा ते दुसऱ्या दिवशी सकाळी साडेनऊदरम्यानचा आहे.




याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. काम सुरू होताच साहित्यावर डल्ला मारणारा चोरटा कोण? आता पोलिसांच्या तपासाकडे लक्ष लागले आहे

# पिवळ्या पाण्याची शिक्षा...



आजवर ङ्ककाळे पाणीफ अनेकांना ठाऊक असेल; परंतु तूर्तास नाशिकमध्ये ङ्कपिवळे पाणीफ चर्चेत आहे, ते त्याच्या गंभीर परिणामांमुळे. मूळचे नाशिककर असलेल्या स्वातंत्र्यवीर सावरकरांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली होती. त्याच भूमीतील रहिवाशांना आता पिवळ्या पाण्याची शिक्षा मिळते आहे. अर्थात, स्वातंत्र्यवीरांच्या शिक्षेशी त्याची तुलना होऊ शकत नाही. दोहोंचा तसा दुरान्वयेही संबंध नाही. नाशिककर हा त्यातला समान धागा. स्वातंत्र्यवीरांचा लढा स्वातंत्र्यप्राप्तीसाठी होता. स्वातंत्र्य मिळाले खरे; पण त्याच्या अनेक वर्षांनंतरही दुर्दैवाने या तीर्थनगरीच्या वाट्याला रसायनयुक्त पाण्याचे भोग आले आहेत. नाशिकच्या अंबड औद्योगिक वसाहतीलगतच्या दत्तनगर भागात बोअरवेलमधून येणाऱ्या पाण्यात ङ्कक्रोमियम हेक्साव्हॅलेंटफ हे कर्करोगजन्य विषारी रसायन आढळून आले. ज्यामुळे हजारो लोकांच्या केवळ आरोग्याचाच प्रश्न निर्माण झाला नाही, तर भूजल स्रोतही कायमस्वरूपी दूषित वा निकामी होण्याचे संकट ओढावले आहे. मेटल-प्लेटिंगफ्च्या काही उद्योगांनी रसायनयुक्त पाणी नाले-ओहोळांत सोडल्याने जलस्रोत प्रदूषित झाले. शेकडो नागरिकांना त्वचारोगासह इतर आजार जडले. सजग नागरिक आणि पर्यावरणप्रेमींच्या बऱ्याच खटपटीनंतर प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि ङ्कएमआयडीसीफ्ने या उद्योगांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या. काहींना थेट ङ्कसीलफ्च केले. वस्तुतः या प्रदूषणासाठी एकट्या उद्योगांना दोषी ठरवता येणार नाही. कारखान्यांशी संबंधित प्रत्येक यंत्रणा त्यासाठी जबाबदार आहे. दूषित पाण्याचे स्रोत कायमस्वरूपी थांबविण्यासाठी काय प्रयत्न केले, यावर कोणीच बोलायला तयार नाही. उद्योजक एक तपापेक्षा अधिक काळापासून सीईटीपी (कॉमन एफ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट) साठी मागणी व पाठपुरावा करीत आहेत. इतकी वर्षे ही मूलभूत व्यवस्था उभी न राहिल्याने शेवटी काहींनी पदरमोड करून खासगी केंद्र उभारले. ज्यांना ते शक्य झाले नाही, ते कारवाईच्या तडाख्यात सापडले. आता शासन-प्रशासनाने ङ्कवरातीमागून घोडेफ दामटले आहे. ङ्कसीईटीपीफ्चे दोन युनिट लवकरच सुरू होणार असल्याच्या वल्गना केल्या जात आहेत, ज्या मागील कुंभमेळ्यातही केल्या होत्या. सुमारे पंचवीस हजार लोकसंख्येच्या दत्तनगरमधील बोअरवेलच्या पाण्यात प्रतिलिटर ५० मिलिग्रॅमपेक्षाही अधिक क्रोमियम आढळले, जे किमान एक हजारपट अधिक आहे. बहुतांश प्रभावित लोक मजूर आहेत. त्यापैकी बरेच इतर राज्यांतून आले आहेत. बरे, हे हलाहलयुक्त पाणी नाले अन् उपनद्यांच्या माध्यमातून थेट पवित्र गोदावरीत मिसळते, जेथे काहीच महिन्यांनी कोट्यवधी लोक पवित्र स्नानासाठी डुबकी मारणार आहेत. या सोहळ्याचे ध्वजारोहण अवघ्या दोन आठवड्यांवर असताना, या जागतिक उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात असल्याच्या प्रशासनाच्या दाव्याची विषारी पाण्याने पोलखोलच केली. कारण गोदावरी व तिच्या उपनद्यांची स्वच्छता हाच तर या सोहळ्याचा गाभा आहे. नदी शुद्धीकरणात केवळ घाट परिसराचे सौंदर्यीकरणच नव्हे, तर औद्योगिक सांडपाणी, नाले आणि एकूणच भूजल प्रदूषणावर देखरेख व तातडीचे उपायही येतात, याचाच विसर पडला आहे. सिंहस्थ कामांसाठी आंतरराष्ट्रीय मानांकनांचे पालन केल्याचा दावाही वाहून गेला आहे. केवळ कागदी संमतीपत्रे, वार्षिक तपासण्या किंवा नोटिसा धाडणे म्हणजे प्रदूषण नियंत्रण होऊ शकत नाही. आपल्याकडे नद्यांचा उल्लेख माता वा जीवनवाहिनी म्हणून केला जातो; परंतु दुर्दैवाने त्यांची स्वच्छता, प्रदूषणमुक्तीकडे दुर्लक्ष होते. योजनांवर हजारो कोटी रुपये खर्च होऊनही मलमपट्टीपलीकडे काही घडत नाही. वास्तविक, नदी, भूजल स्रोत आणि नळातील पाणीही सुरक्षित ठेवणे हे केवळ पर्यावरणाचे प्रश्न नव्हे, तर ती लोकांच्या मूलभूत हक्कांची लढाईसुद्धा आहे. त्यामुळे या पिवळ्या पाण्याची शिक्षा सामान्यांना नव्हे, तर बेफिकीर व्यवस्थेला मिळायला हवी.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# बांगलादेशची वाटचाल विजयाकडे; अफगाणला विजयासाठी अद्याप 347 धावांची गरज : दासचे शतक

■ अबुधाबी/वृत्तसंस्था

येथे सुरु असलेल्या एकमेव कसोटी सामन्यात सोमवारी खेळाच्या चौथ्या दिवसाअखेर अफगाण संघाला विजयासाठी 347 धावांची गरज आहे. या कसोटीतील खेळाचा एक दिवस बाकी आहे. बांगलादेशने दुसऱ्या डाव 7 बाद 372 धावांवर घोषित करून अफगाणला निर्णायक विजयासाठी 479 धावांचे कठिण आव्हान दिले. अफगाणने दिवसअखेर दुसऱ्या डावात 3 बाद 132 धावा जमविल्या.



या कसोटी सामन्यात बांगलादेशने पहिल्या डावात 346 धावा जमविल्यानंतर अफगाणचा पहिला डाव 240 धावात आटोपला. बांगलादेशने पहिल्या डावात 106 धावांची आघाडी मिळवली. त्यानंतर बांगलादेशने दुसऱ्या डावात दमदार फलंदाजी केली. 6 बाद 223 या धावसंख्येवरून बांगलादेशने चौथ्या दिवशीच्या खेळाला पुढे प्रारंभ केला. बांगलादेश संघातील लिटन दासने 117 चेंडूत 14 चौकारांसह 102 धावांची शतकी खेळी केली. कर्णधार नजमुल हुसेन शांतोने 191 चेंडूत 5 चौकारांसह 82 तर मुशफिकुर रहिमने 148 चेंडूत 9 चौकारांसह 81 धावा झळकाविल्या. मेहदी हसन मिराझने 87 चेंडूत 5 चौकारांसह नाबाद 52 धावा जमविल्या. बांगलादेशने 105.2 षटकात 7 बाद 372 धावांवर दुसऱ्या डावाची घोषणा केली. अफगाणतर्फे अहमदझाइ सलिम, झियाऊर रेहमान यांनी प्रत्येकी 2 तर कैस अहमदने 1 गडी बाद केला.

अफगाणला निर्णायक विजयासाठी 479 धावांचे कठिण आव्हान मिळाल्यानंतर त्यांनी दुसऱ्या डावात दिवसअखेर 50 षटकात 3 बाद 132 धावा जमविल्या. सलामीचा अब्दुल मलिक 2 धावांवर बाद झाला. शाहिदुल्लाहने 4 चौकारांसह 19 धावा जमविल्या. कर्णधार रेहमत शहा आणि अटल यांनी तिसऱ्या गड्यासाठी 82 धावांची भागिदारी केली. चौथ्या दिवशीचा खेळ संपण्यापूर्वी बांगलादेशच्या इबादत हुसेनने रेहमत शहाला झेलबाद केले. त्याने 1 षटकार आणि 5 चौकारांसह 51 धावा जमविल्या. दिवसअखेर अटल 1 षटकार आणि 1 चौकारासह 35 तर शाहिदी 1 षटकार आणि 2 चौकारांसह 19 धावांवर खेळत होते. बांगलादेशतर्फे इबादत हुसेनने 2 तर हसन मेहमुदने 1 गडी बाद केला.

संक्षिप्त धावफलक : बांगलादेश प. डाव 346, अफगाण प. डाव 240, बांगलादेश दु. डाव 105.2 षटकात 7 बाद 372 डाव घोषित (लिटन दास 102, नजमुल हुसेन शांतो 82, मुशफिकुर रहिम 81, मेहदी हसन मिराज नाबाद 52, अहमदझाइ, सलिम व झियाऊर रेहमान प्रत्येकी 2 बळी). अफगाण दु.डाव 50 षटकात 3 बाद 132 : एस. अटल खेळत आहे 35, शाहिदुल्लाह 19, रेहमत शहा 51, एच. शाहिदी खेळत आहे 19. इबादत हुसेन 2-32, हसन मेहमूद 1-31.

## तिसऱ्या दिवशी हॉकीचे सामने बरोबरीत

**नवी दिल्ली :** सोमवारी येथे हॉकी इंडिया सिनियर मेन्स नॅशनल चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या दिवशी, 'बी' डिव्हिजनमध्ये केरळने छत्तीसगडविरुद्ध झुंजार पुनरागमन करत सामना 2-2 असा बरोबरीत सोडवला.दिवसाच्या दुसऱ्या सामन्यात झारखंडने तेलंगणाविरुद्ध 1-1 अशी बरोबरी साधली. दुसऱ्या दिवशी ओडिशाकडून 0-9 ने पराभूत झालेल्या केरळने पुनरागमन करत 'अ' गटात एक गुण मिळवला. 29 व्या मिनिटाला अनूप कुमार मौर्यने मैदानी गोल करून केरळला आघाडी मिळवून दिली. 45 व्या मिनिटाला कर्णधार संदीप कुमारने पेनल्टी कॉर्नरवर गोल करून छत्तीसगडला बरोबरी साधून दिली आणि 48 व्या मिनिटाला सोनू निशादने खुल्या मैदानातून गोल करून आघाडी घेतली. मात्र, 59 व्या मिनिटाला केरळच्या संदीप यादवने पेनल्टी कॉर्नरवर गोल करून सामना बरोबरीत आणला. 'ब' गटात झारखंड आणि तेलंगणा यांनीही प्रत्येकी एक गुण मिळवला.

## पाकची विजयी आघाडी; लंकेचा ८२ धावांनी पराभव

■ रावळपिंडी/वृत्तसंस्था

तीन सामन्यांच्या टी-20 मालिकेतील येथे खेळविण्यात आलेल्या दुसऱ्या सामन्यात पाकने लंकेचा 82 धावांनी दणदणीत पराभव करत 2-0 अशी विजयी आघाडी मिळवली. या सामन्यात पाकतर्फे टी-20 प्रकारातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या नोंदविली गेली. कर्णधार साहिबजादा फरहान आणि माझ सदाकत यांनी दमदार अर्धशतके झळकाविली.



या मालिकेतील रावळपिंडीतील पहिल्या सामन्यात पाकने लंकेचा 4 गड्यांनी पराभव केला होता. त्यानंतर पाकने या मालिकेतील सलग दुसरा सामना जिंकून विजयी आघाडी मिळवली आहे. आता उभय संघातील तिसरा आणि शेवटचा सामना मंगळवारी येथे खेळवला जाईल. या टी-20 मालिकेनंतर येत्या रविवारपासून पाकमध्ये तिरंगी वनडे मालिका सुरु होणार असून या मालिकेत पाक, लंका आणि इंग्लंड यांचा समावेश आहे. या दुसऱ्या सामन्यात लंकेचे क्षेत्ररक्षण अत्यंत गचाळ झाले. लंकेकडून मिळालेल्या जीवदानाचा फरहान आणि सदाकत यांनी पुरेपूर फायदा उठविला. पाकच्या या दोन्ही फलंदाजांकडून या मालिकेत सलग दुसरे जलद अर्धशतक नोंदविले गेले आहे. लंकेच्या महेश तिक्ष्णाकडून फरहानला जीवदान मिळाले. तसेच जयवर्धनेकडून कर्णधार फरहानला आणखी एक जीवदान मिळाले. यावेळी तो केवळ 11 धावांवर खेळत होता. फरहानने आपल्या 73 धावांच्या खेळीमध्ये 5 षटकार आणि 4 चौकार ठोकले. सदाकतचे शतक केवळ 4 धावांनी हुकले. त्याने 51 चेंडूत 7 षटकार आणि 6 चौकारांसह 96 धावांची जलद खेळी केली. 15 व्या षटकात शनाकाच्या गोलंदाजीवर फरहान तिक्ष्णाकरवी झेलबाद झाला. तर डावातील शेवटच्या षटकामध्ये सदाकत मलिंगाच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. फक्र झमानने 17 चेंडूत 4 चौकारांसह 22 धावा जमविल्या. पाकच्या डावामध्ये कर्णधार फरहान आणि झमान यांनी सलामीच्या गड्यासाठी 41 चेंडूत 55 धावांची भागिदारी केली. त्यानंतर फरहान आणि सदाकत यांनी दुसऱ्या गड्यासाठी 88 धावांची भर घातली. हसन नवाज 1 षटकार आणि 1 चौकारासह 19 धावांवर नाबाद राहिला. लंकेतर्फे तिक्ष्णा, मलिंगा आणि शनाका यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला. पाकच्या डावात 13 षटकार आणि 15 चौकार नोंदविले गेले. पाकने 20 षटकात 3 बाद 215 धावा जमवित लंकेला विजयासाठी 216 धावांचे आव्हान दिले. टी-20 प्रकारात पाकने 2021 साली इंग्लंड विरुद्ध 6 बाद 232 धावा जमविल्या होत्या. त्यानंतर पाकची ही दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या आहे. प्रत्युत्तरादाखल खेळताना लंकेने 20 षटकात 7 बाद 133 धावा जमविल्या. विक्रमसिंगे 24 चेंडूत 1 षटकार आणि 1 चौकारासह 29, तिक्ष्णाने 26 चेंडूत 4 चौकारांसह नाबाद 32, कमिंदू मेंडीसने 1 षटकार आणि 2 चौकारांसह 23, जयवर्धनेने 4 चौकारांसह 22 धावा जमविल्या.

## पॉवेल, रुदरफोर्ड यांना सक्त ताकीद

**नवी दिल्ली :** पाच सामन्यांच्या टी-20 मालिकेतील शुक्रवारी रांचीमध्ये झालेल्या दुसऱ्या सामन्यात आयसीसीच्या शिस्तपालन नियमाचा भंग केल्याबद्दल विंडीज संघातील रोव्हमन पॉवेल आणि शेर्फेनी रुदरफोर्ड यांना सक्त ताकीद देऊन सोडण्यात आले. या दुसऱ्या सामन्यात विंडीजच्या डावातील सहाव्या षटकात मयांक यादवने रुदरफोर्डला बाद केले त्यावेळी पंचांनी दिलेल्या निर्णयावर नापसंती दर्शविताना रुदरफोर्डने मोठ्या आवाजात काही शब्द उच्चारले. त्याची दखल मैदानावरील पंचांनी आणि सामनाधिकाऱ्यांनी घेतली. तसेच विंडीजच्या डावातील 13 व्या षटकात मयांक यादवचा चेंडू वाईड असल्याच्या संशयावरून रुदरफोर्डने पंचांच्या दिशेने विक्षिप्त हावभाव करून हातवारे केले. पण पंचांनी यादवचा हा चेंडू वाईड ठरविला नाही. गेल्या 24 महिन्यांच्या कालावधीतील रुदरफोर्ड आणि पॉवेल यांच्याकडून हा पहिलाच गुन्हा असल्याने आयसीसीच्या शिस्तपालन समितीने त्यांना याप्रकरणी सक्त ताकिद देऊन सोडण्यात आले.

## महिलांच्या मैत्रीपूर्ण फुटबॉल सामन्यात रशियाकडून भारताचा दारुण पराभव

■ कोलकाता/वृत्तसंस्था

येथे रविवारी झालेल्या दुसऱ्या महिला आंतरराष्ट्रीय फुटबॉल मैत्रीपूर्ण सामन्यात भारताला रशियाकडून 0-8 असा पराभव पत्करावा लागला. पहिल्या मैत्रीपूर्ण सामन्यात 0-4 ने झालेल्या पराभवात पहिल्या हाफमध्ये बऱ्याच काळासाठी प्रतिकार केला होता. पण यावेळी भारतीय संघ पूर्णपणे हतबल झाला आणि मध्यांतरापूर्वीच पाच गोल स्वीकारले.



डारिना इश्मुखामेतोवा, मरीन अचोयान आणि नतालिया माशिना यांनी प्रत्येकी दोन गोल केले, तर डायना किश्माखोवा आणि एलिझावेटा सेमेनोवा यांनीही रशियासाठी गोल नोंदवले. रशियाने सुरेख ताळमेळ साधत भारताच्या बचावाला खिंडार पाडले आणि आपल्या वेगाचा वापर करून वारंवार फटी शोधल्या. पहिला गोल 21 व्या मिनिटाला झाला. क्सेनिया डोल्गोवा डाव्या बाजूने पुढे सरसावली आणि तिने एक खालून क्रॉस दिला. गोलरक्षक मोनालिशा देवीच्या हातून चेंडू निसटला, ज्यामुळे इश्मुखामेतोवाला परत आलेला चेंडू गोलजाळ्यात टाकण्याची संधी मिळाली. चार मिनिटांनंतर, अचोयानने दुसरा शानदार गोल केला. गोलपासून सुमारे 30 यार्डांवर एक सुटलेला चेंडू ताब्यात घेऊन, तिने इंडियन संघाच्या एकामागून एक बचावपटूंना चकवत वरच्या उजव्या कोपऱ्यात उजव्या पायाने एक जोरदार फटका मारला.

29 व्या मिनिटाला, अझालिया झल्मिएवा आणि अचोयान यांनी मिळून तिसरा गोल घडवून आणला. अचोयानने भारतीय बचावपटूंमधून किश्माखोवासाठी एक उत्कृष्ट पास दिला, जिची उजव्या बाजूने धाव कोणाच्याही अडथळ्याविना पुढे गेली. या देवाणघेवाणीतील हालचाल आणि अचूकतेमुळे भारताचा बचाव गाफील राहिला आणि किश्माखोवाने जवळच्या पोस्टवर गोल केला. 42 व्या मिनिटाला पेनल्टी स्पॉटवरून चौथा गोल झाला. पहिल्या मैत्रीपूर्ण सामन्यात दोन गोल करणाऱ्या किरा पेट्रुखोवाने अनेक बचावपटूंना चकवत बॉक्समध्ये मुसंडी मारली, पण जुली किशनने तिला खाली पाडले. इश्मुखामेतोवाने पुढे येत मोनालिसाला चुकीच्या दिशेने पाठवले. बचावफळीतील आणखी एका चुकीमुळे मध्यंतरापूर्वी रशियाला पाचवा गोल मिळाला. इश्मुखामेतोवाने एका निष्काळजी भारतीय खेळाडूचा पास अडवला, उजव्या बाजूने पास देऊन अचोयानसाठी संधी निर्माण केली. त्या मिडफिल्डरने घुगांचा बचाव भेदून मोनालिसाला चकवत आपला दुसरा गोल केला. एका खराब क्लिअरन्समुळे माशिनाला पेनल्टी एरियामध्ये चेंडूचा ताबा मिळाला. कोणीही मार्किंग न केल्यामुळे, तिने नंदिनीच्या पायांमधून गोल करून 7-0 अशी आघाडी घेतली. 74 व्या मिनिटाला रशियाने गोल करून गोलफलक पूर्ण केला. बॉक्समध्ये टाकलेल्या लांब थ्रोमुळे चेंडू माशिनापर्यंत पोहोचला, तिने तो एरियाच्या कडेला असलेल्या एलिझावेटा सेमेनोवाकडे परत दिला. सेमेनोवाने चेंडू नियंत्रित केला, एका कुशल हालचालीने जागा तयार केली आणि उजव्या पायाने एक जोरदार शॉट मारून चेंडू खालच्या-डाव्या कोपऱ्यात धाडत एकतर्फी विजय साकार केला.

# शेलसूर येथे नारीशक्ती महिला शेतकरी समूहाचा जलसंधारणासाठी पुढाकार!

## महिला बचतगटाच्या सहाय्याने बंधाऱ्यातील गाळ काढण्यास सुरुवात; महिलांचे स्वयंप्रेरणेने श्रमदान..

**जनसंचलन/बुलढाणा**

दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करून जलसंधारणाला चालना देण्यासाठी सेवा संकल्प अभियानांतर्गत शेलसूर येथील नारीशक्ती महिला शेतकरी समूहाने पुढाकार घेतला आहे. गावकऱ्यांच्या सहकार्याने आणि स्वयंप्रेरणेने बंधाऱ्यातील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. पाण्याचे महत्त्व ओळखून महिलांनी श्रमदानातून जलसंधारणाचा संकल्प केला असून, त्यांच्या या उपक्रमातून लोकसहभागातून जलसंवर्धनाचा संदेश दिला जात आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा उद्देश पावसाचे पाणी अडविणे, जमिनीत पाणी मुरविण्यास मदत करणे, बंधाऱ्याची पाणी साठवण क्षमता वाढविणे आणि भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता कमी करणे हा आहे. सध्याच्या दुष्काळसदृश परिस्थितीत जलसंधारणाची गरज लक्षात घेऊन महिला शेतकरी समूहाने हा उपक्रम हाती घेतला आहे. गावाच्या पाणीप्रश्नावर मात करण्यासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीतून योगदान देण्याचा संदेश या महिलांनी दिला. गावकऱ्यांच्या सहकार्याने सुरू झालेला हा उपक्रम महिला सक्षमीकरण, सामूहिक प्रयत्न आणि पर्यावरण संवर्धन यांचा संगम ठरत आहे. बंधाऱ्यातील गाळ काढल्यामुळे पाणी साठवण क्षमतेत सुधारणा होण्यास मदत होऊ शकते. पावसाचे पाणी अडविणे आणि जमिनीत जिरविण्याच्या प्रयत्नांमुळे भूजल पुनर्भरणालाही हातभार लागू शकतो. त्यामुळे जलसंधारणाची कामे लोकसहभागातून राबविणे ही काळाची गरज बनली आहे. यावेळी कृषी विभागाच्या मेंटर सौ.भागले मॅडम, मृद व जलसंधारण समन्वयक शिवशंकर गव्हाळे तसेच संस्थेचे परिवर्तन भागीदार गजानन रिंढे उपस्थित होते.



शेलसूर येथील नारीशक्ती महिला शेतकरी समूहाने घेतलेला हा पुढाकार इतर गावांनाही जलसंधारणाच्या कामासाठी प्रेरणा देणारा आहे. महिलांची एकजूट, ग्रामस्थांचे सहकार्य आणि श्रमदानाची भावना यांच्या माध्यमातून पाणीटंचाईवर मात करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज या उपक्रमातून अधोरेखित झाली आहे. थेंब थेंब पाणी अडवूया, श्रमदानातून जलसंधारण करूया आणि आपले गाव जलसमृद्ध बनवूया!फ्फ हा संदेश नारीशक्ती महिला शेतकरी समूहाच्या या उपक्रमातून देण्यात येत आहे. या उपक्रमात नारीशक्ती महिला शेतकरी समूहाच्या अध्यक्षा सौ. कविताताई घोराडे यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्षा अलकाताई हरिदास रिंढे, सौ. सुचिता गजानन घोराडे, संगीता विठ्ठल भोरडे, जया गजानन रिंढे, अर्चना प्रशांत रिंढे, कविता अशोक रिंढे, कुसुम राजेंद्र काळे, शितल दीपक रिंढे, मीरा पांडुरंग शिंदे आणि जया पुरुषोत्तम रिंढे यांच्यासह समूहातील महिलांनी स्वयंप्रेरणेने उपस्थित राहून श्रमदानात सहभाग नोंदविला.

# प्रारूप मतदार यादीवर दावे व हरकती दाखल करण्यास २६ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

**जनसंचलन-बुलढाणा**

यादीच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीसाठी दावे व हरकती सादर करण्याच्या मुदतीत भारत निवडणूक आयोगाने पुन्हा वाढ केली आहे. त्यानुसार, आता नागरिकांना २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दावे व हरकती दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी मात्र पूर्वीच्या वेळापत्रकानुसार १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक कार्यालय यांनी दिली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या सुधारित वेळापत्रकानुसार, दावे व हरकती सादर करण्याचा २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत सादर करता येतील. तसेच नोटीस टप्पा आणि दावे व हरकती निकाली काढण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्यानंतर १६ नोव्हेंबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. मतदार यादीत नाव समाविष्ट करणे, नोंदींमध्ये दुरुस्ती करणे तसेच आवश्यकतेनुसार हरकती दाखल करण्यासाठी ही मुदतवाढ महत्वाची आहे. त्यामुळे पात्र नागरिकांनी या वाढीव मुदतीचा लाभ घेऊन आपले दावे व हरकती विहित वेळेत सादर करावेत, असे आवाहन उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.

# सेवा संकल्प अभियानांतर्गत उद्या खामगाव येथे बालकांसाठी शस्त्रक्रिया शिबिर

**जनसंचलन-बुलढाणा**

सेवा संकल्प अभियानांतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम (आरबीएसके) मार्फत सामान्य रुग्णालय, खामगाव येथे बुधवार, दि. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी बालकांसाठी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात टंग टाय (जिभेखालील पडदा लहान असणे), सिस्ट तसेच इतर आरोग्यविषयक समस्यांनी ग्रस्त बालकांची तपासणी करून आवश्यकतेनुसार शस्त्रक्रिया व उपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले आणि जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर आयोजित करण्यात येत आहे. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत बालकांमधील जन्मजात व्यंग, विकासात्मक अडचणी आणि विविध आजारांचे लवकर निदान करून त्यांच्यावर वेळेत उपचार करण्यावर भर दिला जातो. या शिबिरामुळे गरजू बालकांना आवश्यक आरोग्यसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, वेळेवर निदान व उपचारांमुळे बालकांचे आरोग्य सुधारण्यासह त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार आहे. बालकाला जीभ हलविण्यात, बोलताना किंवा खाण्या-पिण्यात अडचण जाणवत असल्यास अथवा शरीरावर गाठ किंवा सूज आढळल्यास पालकांनी शिबिराचा लाभ घ्यावा. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत बालकांची तपासणी करून आवश्यकतेनुसार पुढील उपचारांसाठी संदर्भसेवाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पालकांनी आपल्या बालकांची आरोग्य तपासणी करून घेण्यासाठी या शिबिरात सहभागी व्हावे आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# १६ व १७ रोजी दोन दिवसीय ग्रंथोत्सव; ग्रंथविक्री, प्रदर्शनी व विविध बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन

**जनसंचलन-बुलढाणा**

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयातर्फे दि. १६ आणि १७ ऑक्टोंबर २०२६ रोजी दोन दिवसीय ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गर्दे वाचनालयाच्या सभागृहातील या ग्रंथोत्सवात वाचन संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी ग्रंथप्रदर्शन, ग्रंथविक्री, कविसंमेलन, व्याख्याने, तसेच विविध बहुरंगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवार, दि. १६ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता हुतात्मा स्मारकापासून गर्दे वाचनालयापर्यंत ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन होणार आहे. यावेळी शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, सहायक माहिती अधिकारी सतिश बगमारे, गर्दे वाचनालयाचे अध्यक्ष गोकुल शर्मा उपस्थित राहतील. सकाळी ११ वाजता उद्घाटन समारंभ जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी जेष्ठ साहित्यिक रमेश इंगळे उत्रादकर, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा पोलिस अधिक्षक निलेश तांबे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर आदी उपस्थित राहणार आहेत. दुपारी २.३० ते ३.३० वाजेदरम्यान ङ्गलेखन वाचन संवादफ मध्ये लेखक सुभाष किन्होळकर, कवी समीक्षक तथा प्रकाशक रविद्र साळवे सहभागी होतील. तर दुपारी ३.३० ते ५ वाजेदरम्यान कृत्रीम बुद्धिमता, डिजिटल ग्रंथालय व ई-संसाधने या विषयावर डॉ. निलेश गावंडे,




डॉ. श्रीकांत पाटील व डॉ. रविंद्र सरोदे सहभागी होतील. ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी दि. १७ ऑक्टोंबर रोजी सकाळी ११ वाजता पहिला सत्रात ङ्गमी जिजाऊ बोलतोफ या एकपात्री प्रयोग अकोट येथील हर्षदा इंदाने सादर करतील. दुपारी ११.३० ते २ वाजेदरम्यान ङ्गमराठी, लोक व ज्ञान भाषा व्हावीफ या विषयावर प्रा. कमलेश खिल्लारे यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद. यामध्ये प्रमुख वक्ते डॉ. प्रदीप बारळ, विनायक वरणगावकर, मधुकर वडोदे, किरण डोंगरदिवे व महेंद्र बोर्डे सहभागी होणार आहे. दुपारी ३ ते ४.३० वाजता रमेश आराख यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन आणि गझलफ यामध्ये गोविंद रहाटे, सुरेश इंगळे, वैशाली तायडे, विशाल खोंदले सहभागी होतील.

दोन दिवशीय ग्रंथोत्सवाला जिल्ह्यातील ग्रंथालय कर्मचारी आणि पदाधिकारी तसेच नागरिकांनी कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी डॉ. अ.पु. वानखडे यांनी केले आहे.



# शाळा वेळेत प्रचार होत असताना प्रशासनाचे दुर्लक्ष होतय का?पालकांचा संतप्त सवाल!

## शाळा वेळेतच शिक्षक निवडणूक प्रचाराला शिक्षकांना जुंपल्याची चर्चा; चौकशीची मागणी!

**जनसंचलन चिखली**

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना चिखली तालुक्यात एक धक्कादायक प्रकार समोर येत आहे. निवडणुकीच्या प्रचारासाठी काही शिक्षकांना शालेय वेळेतच प्रचाराला जुंपले जात असल्याची चर्चा असून याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा सवाल पालक वर्गातून उपस्थित केला जात आहे. भारत निवडणूक आयोगाने २२ सप्टेंबर रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. यानुसार महाराष्ट्रातील ५ जागांसाठी निवडणूक होत आहे. अधिसूचना २९ सप्टेंबर, अर्जाची शेवटची तारीख ६ ऑक्टोबर, छाननी ७ ऑक्टोबर, माघार ९ ऑक्टोबर, मतदान २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत आणि मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी होणार आहे.बुलढाणा जिल्हा अमरावती विभागात येत असल्याने चिखली तालुक्यात प्रचाराची लगबग वाढली आहे.शिक्षकांना पदवीधर मतदारसंघात मतदार म्हणून मतदान करण्याचा पूर्ण अधिकार आहे. शालेय वेळेनंतर आणि सुट्टीच्या दिवशी ते प्रचारातही सहभागी होऊ शकतात. मात्र, शालेय वेळेत प्रचाराला सक्त मनाई आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ आणि कायदा २००९ कलम २७ नुसार शासकीय वेळेत राजकीय प्रचार करता येत नाही. जिल्हाधिकारी यांनी कलम १६३ अन्वये आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार सर्व शासकीय कार्यालये, शाळा आणि शासकीय विश्रामगृह परिसरात प्रचार, सभा, मिरवणूक यास मनाई आहे. हा आदेश ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत लागू असून उल्लंघन केल्यास कलम २२३ नुसार कारवाई होईल.




नियम स्पष्ट असतानाही पदवीधर उमेदवार असलेल्या एका शिक्षकाकडून इतर शिक्षकांना शाळा वेळेतच प्रचारात उतरवल्याची चर्चा जोरात आहे. सकाळी १० ते ५ या शालेय वेळेत शिक्षकांनी शाळेत हजर राहणे अपेक्षित असताना काही ठिकाणी शाळा वेळेआधीच सोडून प्रचार केला जात असल्याचा आरोप पालक करत आहेत. याकडे गटशिक्षणाधिकारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांनी लक्ष घालून चौकशी करावी,अशी मागणी होत आहे.

# गरब्याच्या तालावर अन्नदात्याची हाक; नित्यश्रीच्या सादरीकरणाला सन्मानाची दाद!

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर जनजागृती; उत्कृष्ट सामाजिक संदेश पुरस्काराने गौरव

**जनसंचलन बुलढाणा**

गरब्याचा ताल, उत्सवाचा जल्लोष आणि त्यातून अन्नदात्याच्या प्रश्नांची जाणीव! बुलढाणा अर्बन-हॅलो बुलढाणा आयोजित गरबा महोत्सव २०२६ मध्ये कु. नित्यश्री संतोष शिंगणे हिने पारंपरिक नृत्याला सामाजिक संदेशाची जोड देत उपस्थितांचे लक्ष वेधले. तिच्या कल्पक सादरीकरणाची दखल घेत सहकार विद्या मंदिरतर्फे तिला उत्कृष्ट सामाजिक संदेशक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शेतकऱ्यांचे जीवन, शेतीचे महत्त्व आणि अन्नदात्याप्रती समाजाची जबाबदारी या विषयांना नित्यश्रीने आपल्या कलेतून आवाज दिला. उत्सवाच्या आनंदातही शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे भान जपणारे तिचे सादरीकरण सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देणारे ठरले.



नृत्याच्या प्रत्येक आविष्कारातून समाजप्रबोधनाचा प्रयत्न करत तिने गरब्याच्या व्यासपीठावर वेगळी छाप उमटवली. कला आणि संस्कृतीच्या माध्यमातून जनजागृती करता येते, हे तिच्या उपक्रमाने अधोरेखित केले. या सन्मानामुळे नित्यश्रीच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळाले असून, सामाजिक विषयांना कलात्मक अभिव्यक्ती देणाऱ्या तिच्या प्रयत्नाचे कौतुक होत आहे. तिचे अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

# कारंजा चौकात यंदा काय खास?५३ वर्षांची परंपरा अन् खाटू श्यामच्या देखाव्याने वेधले लक्ष!

## दुर्गामातेच्या दरबारात भक्तीचा जागर; रोज महाआरती अन् महाप्रसादाचा सोहळा!

**जनसंचलन/बुलढाणा**

परंपरेचा अभिमान, श्रद्धेची अखंड ज्योत आणि भक्तीचा उत्साह! बुलढाणा शहरातील कारंजा चौक येथील दुर्गा माता मंदिराचा नवरात्र महोत्सव यंदा ५३व्या वर्षात दाखल झाला आहे. ११ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या उत्सवाने परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण केले असून, देवीच्या दर्शनासाठी दररोज शेकडो भाविक सहभागी होत आहेत. यंदाच्या उत्सवाचे खास आकर्षण ठरले आहे ते खाटू श्याम बाबा मंदिराचा देखावा! मंदिर समितीने साकारलेल्या या आकर्षक देखाव्यामुळे नवरात्र सोहळ्याला वेगळे रूप मिळाले आहे. देवीची आराधना आणि खाटू श्याम बाबांच्या मंदिराची प्रतिकृती, अशा दुहेरी आकर्षणामुळे भाविकांमध्ये उत्साह आहे. दररोज सायंकाळी ७.३० वाजता महाआरती आयोजित करण्यात येत आहे. आरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप केले जाते. देवीची पूजा-अर्चा, भजन, कीर्तन आणि धार्मिक कार्यक्रमांतून कारंजा चौकात भक्तीचा जागर सुरू आहे. महाआरतीच्या वेळी भाविक एकत्र येऊन दुर्गामातेच्या चरणी श्रद्धा अर्पण करतात. पाच दशकांहून अधिक काळ जपलेली ही उत्सवपरंपरा कारंजा चौकाची खास ओळख बनली आहे. मंदिर समितीच्या सातत्यपूर्ण पुढाकारातून सुरू असलेला हा सोहळा स्थानिक नागरिकांना एकत्र आणतो. श्रद्धेसोबत एकात्मता आणि सामाजिक सलोख्याचा संदेश देणारा



उत्सव म्हणूनही त्याचे महत्त्व कायम आहे. ५३व्या वर्षातील महोत्सवासाठी मंदिर परिसर सज्ज असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्सव भव्य स्वरूपात साजरा होत आहे. आकर्षक देखावा, नियमित महाआरती आणि महाप्रसाद या उपक्रमांतून भाविकांना उत्सवात सहभागी होण्याची संधी मिळत आहे. या परंपरेत प्रत्येक भाविकाचा सहभाग महत्त्वाचा असल्याचा संदेशही समितीने दिला आहे. उत्सवातील कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष कमलेश कोठारी, भगवान जोशी, सुनिता जोशी, शिवाजी पाटील, अशोक व्यास, रवींद्र भगत, निखिल शर्मा, सोमु कायस्थ, सुनिल बोधेकर, निनाजी भगत, रितेश अग्रवाल, जगदीश जोशी, सुधीर जोशी, सुधीर भालेराव, रतन बोर्डे, तुषार कोठारी, गजानन पडोळ, संतोष म्हस्के, दीपल जोशी, रवी ताजने, संतोष ठाकूर, विनोद बराटे, राज पुरोहित, राणाजी, प्रवीण कोचर आणि मंदिर समितीने केले आहे.

# शेंबा बु.मध्ये डेंग्यूची दस्तक; आरोग्य पथकाची घराघरांत धडक!

**जनसंचलन-नांदुरा**

तालुक्यातील शेंबा बु. येथे डेंग्यूचा रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. गावातील रहिवासी आसावरी प्रवीण वराडे यांचा डेंग्यू अहवाल पॉझिटिव्ह आल्याच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने १२ ऑक्टोबर रोजी गावात विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबवली. आता डासांची पैदास रोखण्यासाठी प्रत्येक घरातून खबरदारी घेण्याची गरज आहे. आरोग्य पथकाने घरोघरी जाऊन जलद ताप सर्वेक्षण केले. ताप असलेल्या संशयित रुग्णांचे रक्तजल नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. संपूर्ण गावात कंटेनर सर्वेक्षण करून पाणी साठवलेल्या भांड्यांची तपासणीही करण्यात आली. साचलेल्या पाण्याची विल्हेवाट लावण्याबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन करण्यात आले.



जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मंडाले, जिल्हा हिवताप अधिकारी चव्हाण, अतिरिक्त जिल्हा हिवताप अधिकारी पांडे व होगे, तसेच डॉ. रिंढे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडली. आरोग्य सहाय्यक वैराडकर, कीटकशास्त्रज्ञ मयूर शिरसाठ, प्रदीप झनके, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक आणि आशा सेविका सहभागी झाल्या. पाणी साचू देऊ नका, दर आठवड्याला कोरडा दिवस पाळा आणि ताप आल्यास तातडीने प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे आता महत्वाचा ठरणार आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८